# गरवारे बालभवनच्या खेळण्यांची सूची



गरवारे बालभवन, सारसबागेसमोर, पुणे-411002

website: garwarebalbhavanpune.org email: info@garwarebalbhavanpune.org

दुरध्वनी : 020 24442109

गरवारे बालभवनमधे मुलं अनेक खेळण्यांशी खेळतात. त्यातली काहीं मुलांच्या पसंतीला उतरलेली खेळणी आम्ही ताई मिळून विक्रीसाठी तयार करतो. यातल्या प्रत्येक खेळण्याशी अनेक प्रकारे खेळता येतं. काहीं आम्ही टाकाऊ वस्तूंपासून बनवली आहेत. कला आणि विज्ञान यांचा सुरेख संगम यांच्यात आहे. अनेकांना ती घेता यावीत म्हणून खेळण्यांच्या किंमती माफक ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. त्या खेळण्यांची ही सूची.



## आर्यभट्ट

दोन मुलांनी खेळायचं सुंदर खेळणं. पूर्वी हे खेळणं मोठया नरसाळयांपासून तयार करायचे. आम्ही बाटल्यांपासून बनवलंय. दोरीची हँडल्स दोघांनी धरून हात दूर आणि जवळ घ्यायचे, म्हणजे बाटली पुढे-मागे होते. अगदी लहान मुलांपासून मोठयांपर्यंत सगळयांना वेगवेगळया प्रकारे याच्याशी खेळता येतं.

किंमत : रु. 30/-

## चिमणी शिट्टी

तीसएक वर्षांपूर्वी एका बिस्किटांच्या पुडयासोबत हे खेळणं मिळायचं.
ही शिट्टी नुसती फुंकली, तर एक बारिक आवाज येतो.
पण खाली असलेल्या पाण्याच्या टँकमधे पाणी भरलं,
आणि वाजवली, तर छान चिमणीचा चिवचिवाट ऐकू येतो.
वाजवताना डोकं खाली-वर केलं, तर स्वरही बदलतो.



किंमत : रु. 25/-



## पोई

न्युझिलंडमधल्या माओरी जमातीने हे खेळणं शोधलं. दोऱ्याला लावललं वजन मस्त गोल फिरवायचं. फिरवण्याचे अनेक प्रकार करत मुलांच्या व्यायामात मजा आणणारं हे खेळणं आहे. संगीतावर, नाच करतही पोई फिरवता येईल.

बालभवनच्याच एक ताई पोई घरी शिवतात. बोटात घालयला लूप केल्यामुळे ते धरायला सोपं आहे, आणि रिबीनी गोल फिरताना फिरण्याचा मार्ग छान ट्रेस होतो.

किंमत : रु. 40/-

## गोटीचा उंदिर

हा उंदिर एका चिनी मुलीने दाखवला. पोटात गोटी असलेला हा उंदिर ताटात ठेऊन ताट गोल फिरवलं, की गोटी घरंगळते, आणि उंदिर तुरूतुरू पळतो.

ह्या संचात दोन उंदरांचे कट आऊट आणि दोन गोटया आहेत. तो कसा जुळवायचा त्याच्या सूचनाही आहेतच.

किंमत : रु. 30/-




## चुंबक



मुलांना ज्या वस्तू हातात द्यायलाच हव्यात आणि त्यांना त्या आवडतातही, त्यातली एक म्हणजे चुंबक.
घरातल्या कुठल्या वस्तूंना ते चिकटतात? ते एकमेकांना चिकटतात का?
चुंबक वापरून अनेक खेळणीही बनवता येतात.
हे सर्व करून पाहण्यासाठी आम्ही पाच चुंबकांचा सेट विक्रीला ठेवला आहे.

किंमत : रु. 10/-





## दोन गमतीशीर सापळे

सापळा म्हटलं की मुलांना भीती वाटते आणि कुतुहलही असतं.
हा दोन सापळ्यांचा संच आहे.
एका लटकवायच्या सापळ्याला वायरचे हलते–डुलते हात आणि पाय आहेत. वारा आला, की त्याचे हात पाय मस्त झुलतात.
दुसऱ्या सापळ्याचे सांधे स्टेपलरच्या पिनांनी जोडायचे आहेत. ते आपल्याला कसेही हलवता येतात. बालभवनमधे मुलं ह्या सापळ्याने एक्स रे चा खेळ खेळतात. एकाने सापळ्याचे हात पाय त्याला हव्या त्या स्थितीत ठेवायचे, आणि तो आपला एक्स रे समजून त्याबरहुकुम दुसऱ्याने तसं करून दाखवायचं. खूप मजा येते.
हा सापळा एकदम खऱ्या सापळ्याच्या मापात केला आहे.

हे दोन्ही सापळे करायची सामुग्री दिलेली आहेच, शिवाय आपल्या सगळ्या हाडांची नावं सांगणारं माहिती पत्रकही सोबत दिलं आहे.

किंमत : रु. 30/-





## सुतार पक्षी

GI वायरच्या तारेच्या स्प्रिंगवर हा सुतार पक्षी चिकटवलाय आणि तो नंतर सायकलच्या स्पोकमधे घातला आहे.
स्प्रिंग अश्या मापाची बनवली आहे, आणि पक्षी स्पोकपासून अश्या अंतरावर आणला आहे, की तो वरून सोडल्यावर टक टक करत हळू हळू खाली येतो.
खाली येताना तो फार गमतीशीर दिसतो.
पुन्हा खेळायसाठी पक्षी परत वर न्यायचा.

किंमत : रु. 25/-







## गुरूत्वमध्याची खेळणी

कुठलीही वस्तू बॅलन्स कशी होते, ह्याचं मुलांना कुतुहल वाटतं.
जेव्हा एखाद्या वस्तूचा गुरूत्वमध्य जमिनीलगत आणि टेकूच्या
जवळ असतो, तेव्हा छान तोल सांभाळला जातो.
हे सुंदर पद्धतीने दाखवणारी ही चार खेळणी आहेत;
टुकान पक्षी, जोकर, चतुर, आणि फुलपाखरू.

ती कापून चिकटवायची आणि सोबत दिलेल्या यू पिना वापरून त्यांचा गुरूत्वमध्य बोटाच्या टेकूच्या खाली आणला, की ती मस्त बोटावर, किंवा कुठल्याही कडेवर तोलून राहतात.

चार खेळणी रंगीत आहेत, आणि चार आपल्या मनाने रंगवून करायची आहेत. अशी एकूण आठ खेळणी तयार होतील.

किंमत : रु. 40/-

## CD भिंगरी




CD वर अनेक पॅटर्न चिकटवून आणि घर्षण कमी करायला
गोटीचा टेकू मधे लावून ही भिंगरी तयार केली आहे.
एकदा फिरवल्यावर खूप वेळ फिरत राहते.
चित्रात न्यूटनची चकती लावलेली भिंगरी दाखवली आहे.
ती गोल फिरल्यावर छान पांढरा रंग दिसतो.

किंमत : रु. 20/-








## पपेट शीट

गोष्टी ऐकत मोठी होत असलेली मुलं
जिथे दिसतील, ते घर आनंदी.
मुलांना गोष्टी फक्त ऐकवण्यापेक्षा जर
हातात एखादं पपेट घेऊन सांगितल्या
तर त्यांचा आनंद द्विगुणित होतो.
ह्या पपेट शीटमधे नेहमीच्या गोष्टींमधे
असणारे दहा प्राणी आणि पक्षी दिले आहेत.
उंदिर, मांजर, ससा, डुक्कर, घोडा,
साप, घार, फ्लेमिंगो, टुकान आणि
एक काल्पनिक पक्षी.

ते फक्त कापायचे, चिकटवायचे आणि
बोटात घालून गोष्टी सांगायच्या.

किंमत : रु. 50/-



## रिंग नट

ह्या खेळण्याशी खेळायला फार मजा येते.
जाडया धातूच्या वायरच्या रिंगमधे चार नट घातले आहेत.
रिंग एका हातात उभी धरून नटस् फिरवायचे,
आणि लगेच रिंगही गोल फिरवायची. छान आवाज करत,
गोल फिरत नटस् रिंगमधे खाली येत राहतात.



जोपर्यंत आपण रिंग फिरवत राहू,
तोपर्यंत खेळ चालू राहातो. मुलांना हा
खेळ एकत्र खेळता येईल. एकाने रिंग
फिरवून दुसऱ्याच्या हातात द्यायची.
त्याने नटस् फिरवत ठेवून ती पुढे पास
करायची.

किंमत : रु. 50/-

## कापडी कोडं

हे एक अतिशय महत्वाचं आणि मुलांचं आणि आमचंही
अतिशय आवडतं खेळणं आहे. UNESCO ने Toys for
Children's Rehabilitation ह्या नावाने जी खेळणी
काढली, त्यातलं हे आहे.
दुहेरी कापडाच्या पिशवीला शिवण घालून काहीं कोडी
तयार केली आहेत. आत एक मणी सरकवलेला आहे.
तो बोटांनी चाचपडून सरकवत पुढे न्यायचा.
ह्या कोडयात तो आधी मधे आणि मग पुन्हा
बाहेर न्यायचा.
लहान मुलांची बोटं छान वळावीत म्हणून, आणि
विषेश गरजा असणाऱ्यांसाठीही हा सुंदर व्यायाम आहे.



किंमत : रु. 50/-